RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार—अ

वर्ष ७, अंक ३०] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ३०, २०२१-जानेवारी ५, २०२२/ पौष ९-१५, शके १९४३ [पृष्ठे २५

[ किंमत : रुपये ९.०० ]

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० डिसेंबर २०२१.

### अधिसूचना

क्रमांक भनिनि-२०२१/प्र.क्र.५/सेवा-६.— दरवर्षी केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाकडून सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीतील जमा रकमांवर व्याज अदा करण्यासाठी व्याजाचे दर अधिसूचनेद्वारे प्रसिध्द केले जातात. केंद्र शासनाने निश्चित केलेला व्याजदर हाच राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना भविष्यनिर्वाह निधीच्या जमा रकमेवर व्याज देण्यासाठी निश्चित केला जातो.

सद्य:स्थितीत भविष्यनिर्वाह निधी व्याज दर हा त्रैमासिक प्रसिद्ध केला जात आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक वेळी वरिष्ठ स्तरावर मान्यता घेऊन व्याज दरास प्रसिद्धी देण्याबाबतच्या प्रक्रीयेत होणारा अपरिहार्य विलंब टाळणे आवश्यक झाले आहे. यासाठी शासन आता असे निदेश देत आहे की, माहे १ जानेवारी २०२२ पासून केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाकडून भविष्यनिर्वाह निधीच्या जमा रकमेवर व्याज अदा करण्यासाठी वेळोवेळी जे व्याज दर निश्चित केले जातील, तेच व्याज दर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या जमा रकमेवरील व्याज अदा करण्यासाठी यापुढे लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. अ. धोत्रे,**
शासनाचे उप सचिव.